**शपथेवर पुढील उर्वरीत उलटतपास ॲड.श्री. खेळकर अर्जदारातर्फे :—**

०५. अर्जदार हे दि.३१/१२/२०२० रोजी सेवानिवृत्त झाले आहे. नि.यु.७ वरील पत्र मला दाखविले हे म्हणणे खरे आहे की, सदर पत्राप्रमाणे अर्जदाराच्या शिल्लक असलेल्या सुटया अर्जदार यांना कळविण्यात आल्या होत्या व अर्जदार रजा उपभोगु शकतो. नि.यु.८ वरील पत्र मला दाखविले त्यातील मजकुर खरा आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.यु.९ वरील पत्राप्रमाणे अर्जदाराला कर्मचारी कमी असल्याने रजा न उपभोगता काम करण्याची संधी देण्यात आली होती व त्याबदल्यात ९० दिवसाचा पगार देण्यात येतील असे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत अर्ज हा ९० दिवसाच्या रजेचा मोबदला मिळणेसाठी दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्ज दाखल करणेपुर्वी सामनेवाला यांना नोटीस दिली होती व पगाराची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला ९० दिवसाचा रजेचा मोबदला दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने त्याचे विधिज्ञ श्रीमती.रहाटे यांचेमार्फत रजेचा पगार मिळणे बाबत मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस सामनेवाला यांना प्राप्त झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने नोटीस दिल्यानंतरही त्याला ९० दिवसाचा पगार देण्यात आला नाही.

०६. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला बॅंकेतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखी कैफीयत दाखल करून त्यामध्ये अर्जदाराला ९० दिवसाचा पगार मिळण्यास पात्र आहे असे मान्य केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यास तरी सुध्दा ९० रजेचा पगार देण्यात आला नाही. आता मला नि.सि.१७ वरील ठराव दाखविण्यात आला. सदर ठरावातील मजकुर मला मान्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.सि.२५ वरील ठरावानुसार संचालक मंडळाच्या सभेमध्ये एच.आर.डी. पॉलीसी बदर करण्याचा निर्णय ६

ोतला होता. त्याबाबतची माहिती कर्मचारी संघटनेला देण्यात आली होती किंवा कसे हे मला माहिती नाही. एच.आर डी. पॉलीसी मध्ये बदल करण्याचा घेतलेला निर्णय हा विभागीय निबंधकांना मंजुरीकरीता पाठविण्यात आला होता. सदर बदल विभागीय निबंधक यांनी मंजुर केला किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. एच.आर.डि.पॉलीसी मध्ये केलेला बदल हा विभागीय निबंधक यांनी मंजुर केल्याचे पत्र मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सेवानिवृत्त झालेलो असतांनाही बॅकेने मला सेवेत ठेवलेले असल्यामुळे मी बॅकेच्या वतीने खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हा १२ टक्के व्याजासह रजेचा पगार मिळण्यास पात्र आहे.

**उलटतपास पूर्ण झाला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**स्वा/—**

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. १२.०१.२०२६.